।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)


जा.क्र.कबचौउमवि /०८/ शिष्यवृत्ती /२०२३-२४ / २०६ दि. २७/०४/२०२४

(कालमर्यादित)

प्रति,
मा.संचालक / विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक प्रशाळा / विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय : वैयक्तीक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना.
संदर्भ : १) वित्त विभाग परिपत्रक क्र.:संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ, दि.०४.०३.२०२४
२) मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव यांचे पत्र
जा.क्र./ससं/उशि/जविज/वैयक्तिक लाभाच्या योजना/२०२४/४२७ दि.१५.०४.२०२४

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व २ अवलोकनार्थ सोबत जोडलेले असुन, आपणास कळविण्यात येते की विविध शासकिय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसाठी आपल्या शैक्षणिक प्रशाळा / विभागाची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्या प्रमाणे तात्काळ शिष्यवृत्ती विभागास पाठवावी, जेणे करुन शासनास लवकरात लवकर माहिती कळविणे सुलभ होईल, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव

सोबत:-
१. संदर्भिय पत्र क्र. १ व २


उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत , दुरध्वनी क्र.: ०२५७–२२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७–२२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257- 2258428, 2258429
Fax No. 0257-2258403, 406. E-mail : registrar@nmu.ac.in Web: www.nmu.ac.in

महाराष्ट्र शासन
सहसंचालक
उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत, ग्राहक न्यायालयामागे, आकाशवाणी केंद्राजवळ, जळगाव 425001.
दूरध्वनी व फॅक्स क्रमांक- 0257-2238510 E-mail : jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र./ससं/उशि/जविज/ वैयक्तिक लाभाच्या योजना/2024 | 427 दिनांक- 15/4/2024

प्रति,

1) कुलसचिव,कवयित्री बहिणाबाई चौधरी,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगांव.

2) प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित कायम विना अनुदानीत,कला,
वाणिज्य,विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
जळगांव, धुळे व नंदूरबार.

**विषय:-वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी करावयाच्या उपायोजना..**

**संदर्भ:**-वित्त विभाग परिपत्रक क्रमांक:संकीर्ण-2022/प्र.क्र.27/अर्थबळ,दि.04.03.2024

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या आदिवासी विकास,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य,इतर मागास बहुजन कल्याण,अल्पसंख्यांक विकास,कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता,शालेय शिक्षण व क्रिडा,उच्च व तंत्र शिक्षण,वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये आणि महिला व बालविकास या विभागामार्फत राबविण्यात येणा-या वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मा.मंत्रीमंडळाने दि.11 मे,2022 रोजीच्या बैठकीत विविध वैयक्तिक लाभांच्या योजनांच्या सर्व लाभार्थ्यांचा डेटाबेस तयार करुन तो आधारशी संलग्नित करण्याची कार्यवाही 100% पूर्ण करणेबाबत शासनाने सदर परीपत्रकान्वये सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने खालील तक्त्यात माहिती सादर करण्यात यावी.

| अ.क्र | महाविद्यालयाचे नाव | प्रवेशित विद्यार्थी | आधारशी संलग्नीकृत विद्यार्थी | आधारशी संलग्नीकृत न केलेले विद्यार्थी | आधारशी संलग्नीकृत न केल्याबाबतची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |
| | | | | | |

सदरची माहिती दि.19.04.2024 पर्यंत सादर करण्यात यावी.
सोबत-शासन निर्णाची प्रत जोडली आहे.

(आपला-विश्वासू)

(डॉ.संजय ठाकरे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
जळगांव विभाग, जळगांव

वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

महाराष्ट्र शासन
वित्त, विभाग,
परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ
हुतात्मा राजगुरु चोक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४/०३/२०२४

**वाचा :** १) केंद्र शासनाच्या भारतीय विविशष्ट पहचान प्राधिकरण कार्यालयाचे क्र.१-१/२०१९-UIDAI (DBT) दि. २५ नोव्हेंबर, २०१९ चे परिपत्रक.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंस/नस्ती-२०१०/प्र.क्र.४८/३९, दि. ३ एप्रिल, २०१०.
३) शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२७/अर्थबळ, दि. ८ जून, २०२२.

**प्रस्तावना :**

राज्य शासनाच्या आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्यांक विकास, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, शालेय शिक्षण व क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये आणि महिला व बालविकास या विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजना पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी मा. मंत्रीमंडळाने दि. ११ मे, २०२२ रोजीच्या बैठकीत विविध वैयक्तिक लाभांच्या योजनांच्या सर्व लाभार्थ्याचा डेटाबेस तयार करुन तो आधारशी संलग्नीकृत करण्यात यावा. तसेच पोषण आहार योजनेंतर्गत महिला व बाल विकास, शालेय शिक्षण व क्रीडा, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागांनी पोषण आहाराशी संबंधित सर्व लाभार्थ्यांची नावे आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत पूर्ण करावे व पोषण आहाराशी संबंधित सर्व लाभार्थी आधार कार्डशी जोडूनच दिनांक ०१ जानेवारी, २०२३ पासून संबंधित योजनांना निधी वितरीत करण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

२. उपरोक्त मा.मंत्रीमंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, दि. ०८.०६.२०२२ निर्गमित करण्यात आला व वरीलप्रमाणे वैयक्तिक लाभाच्या योजना आधार कार्डशी संलग्नित करण्याची कार्यवाही ३१ डिसेंबर, २०२२ अखेर १०० % पूर्ण करण्याची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. तथापि, काही विभागांची आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही अद्यापही १०० % पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब, गंभीर असून प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे सूचना संबंधित विभागांना निर्गमित करण्यात येत आहे.

शासन परिपत्रक :-

१. आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, इतर मागास बहुजन कल्याण, अल्पसंख्याक विकास, कौशल्य विकास व उद्योजकता, शालेय शिक्षण व क्रीडा, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये तसेच महिला व बालविकास या विभागांनी त्यांच्या विभागातील वैयक्तिक लाभाच्या योजनांतील लाभधारक/लाभार्थी यांचे आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १००% दि. ३१.०३.२०२४ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

२. आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १००% पूर्ण करण्याची जबाबदारी ही संबंधित विभागाच्या सचिवांची राहील.

३. आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १०० टक्के पूर्ण झाली याचे हमीपत्र संबंधित विभागाच्या सचिवांनी सादर करणे आवश्यक आहे.

४. जे विभाग आधार कार्ड संलग्नीकरणाची कार्यवाही १००% पूर्ण करणार नाहीत व जे विभाग आधार कार्डशी संलग्नीकरण करण्याची कार्यवाही १०० टक्के पूर्ण झाल्याचे सचिवांच्या स्वाक्षरीचे हमीपत्र देणार नाहीत, त्या विभागांना त्या संबंधित योजनांचा निधी दि. ०१.०४.२०२४ पासून वितरीत करण्यात येणार नाही.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३०४१५४०३९९४०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH
UMESHRAO
GAIKWAD

Digitally signed by SANTOSH UMESHRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=SANTOSH UMESHRAO GAIKWAD
Date: 2024.03.04 15:49:56 +05'30'

( संतोष गायकवाड )
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. ५) मा.
५) उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद/विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ, विधानमंडळ, मुंबई.
८) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
९) मा. उप मुख्यमंत्र्यांचे (गृह) प्रधान सचिव.
१०) मा. उप मुख्यमंत्र्यांचे (वित्त) प्रधान सचिव.
११) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.